Maharashtra State Board
of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर–४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

**कालमर्यादित / महत्वाचे** क्र. कोविमं / डीपी / ४७२
सार्वजनिक परीक्षा - प्रथम प्राधान्य दिनांक - ३०.०१.२०२६

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय:** फेब्रु.-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा केंद्रावरील कर्मचारी बदलाबाबत..

**संदर्भ :** १. शासन पत्र क्रमांक- परीक्षा १६२५/प्र.क्र.१३/एसडी-२ दि.०३.१२.२०२५
२. राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र.रा.मं./परीक्षा-५/४१३२ दि.०५.१२.२०२५
३. शासन पत्र क्रमांक - परीक्षा १६२५/प्र.क्र.१३/एसडी-२ दि.३०.०१.२०२६
४. राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र.रा.मं./परीक्षा-५/४३७ दि.३०.०१.२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येत की, फेब्रुवारी-मार्च २०२६ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेत कॉपीमुक्त अभियान राबविण्यासंदर्भात दि.२५.११.२०२५ रोजी मा.शिक्षणमंत्री महोदय यांनी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार संदर्भीय क्र.०१ च्या शासन पत्राच्या अनुषंगाने सदर परीक्षेसाठी निश्चित केलेल्या सर्व केंद्रांवर परीक्षा पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यासाठी ज्या माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी ज्या परीक्षा केंद्रावर प्रविष्ट होणार आहेत, त्या परीक्षा केंद्रांसाठी केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती सदर केंद्राव्यतिरिक्त इतर अन्य माध्यमिक विद्यालय / उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी असे कळविण्यात आले होते.

तथापि उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.०३ अन्वये शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबदल न करता ज्या परीक्षा केंद्रावर CCTV कॅमेरे उपलब्ध होणार नाहीत अशा परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यात यावी.

आपल्या जिल्ह्यातील ज्या परीक्षा केंद्रावर वर्गखोल्यांमध्ये CCTV कॅमेरे उपलब्ध नाहीत अशा परीक्षा केंद्रावरील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती सदर केंद्राव्यतिरिक्त इतर अन्य माध्यमिक विद्यालय / उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्याबाबतची कार्यवाही आपल्यामार्फत करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**(सुभाष चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :
1. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, दक्षता समिती, सातारा, सांगली व कोल्हापूर
2. सर्व मुख्याध्यापक व प्राचार्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये, सातारा, सांगली व कोल्हापूर

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं. १७८,१७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

क्र.रा.मं./परीक्षा-५/437
पुणे-४११ ००४.
दिनांक- ३०/०१/२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय – फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा केंद्रावरील कर्मचारी बदलाबाबत........

संदर्भ – १.शासन पत्र क्रमांक:–परीक्षा–१६२५/प्र.क्र.१३/एसडी–२ दि. ०३ डिसेंबर, २०२५
२.कार्यालयाचे क्रमांक रा.मं./परीक्षा–५/४१३२, दि. ०५/१२/२०२५ रोजीचे पत्र.
३शासन पत्र क्रमांक:–परीक्षा–१६२५/ प्र.क्र.१३/एसडी–२ दि. ३०जानेवारी, २०२६.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेत कॉपीमुक्त अभियान राबविण्यासंदर्भात दि.२५/११/२०२५ रोजी मा.शिक्षणमंत्री महोदय यांनी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार संदर्भिय क्र.१च्या शासन पत्राच्या अनुषंगाने सदर परीक्षेसाठी निश्चित केलेल्या सर्व केंद्रांवर परीक्षा पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी ज्या माध्यमिक विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी ज्या परीक्षा केंद्रावर प्रविष्ट होणार आहेत, त्या परीक्षा केंद्रांसाठी केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती सदर केंद्राव्यतिरिक्त इतर अन्य माध्यमिक विद्यालय/उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी असे कळविण्यात आले होते.

तथापि उपरोक्त संदर्भिय क्र.३ च्या पत्रान्वये शासनाने दिलेल्या निर्देशानुसार आपल्या विभागीय मंडळांतर्गत सर्व परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबदल न करता ज्या परीक्षा केंद्रावर CCTV कॅमेरे उपलब्ध होणार नाहीत अशा परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यात यावी.

तरी उपरोक्त बदलाच्या अनुषंगाने फेब्रुवारी–मार्च २०२६ परीक्षेसाठी आपल्या स्तरावर योग्य नियोजन करून कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने)

Mali
(डॉ. दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे–०४

सोबत – संदर्भिय क्र.३ चे शासन पत्र

प्रत माहितीस्तव सादर –
१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई –३२
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे–१
३. मा. जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)



Scanned with OKEN Scanner

(78)

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३६,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

ईमेल- sd२.sesd-mh@mah.gov.in

क्रमांक:-परीक्षा-१६२५/प्र.क्र.१३/एसडी-२ दिनांक : ३० जानेवारी, २०२६

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

**विषय :- राज्यात कॉपीमुक्त अभियान राबविणे बाबत झालेल्या बैठकिचे इतिवृत्ताबाबत.**
**संदर्भ :- सचिव, राज्य मंडळ, पुणे यांचे दिनांक :२०.०१.२०२६ चे पत्र.**

महोदय,

उपरोक्त पत्रान्वये सचिव राज्य मंडळ,पुणे यांनी राज्य मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षांबाबत चर्चा करण्यासाठी राज्य मंडळ व अनेक राज्य व विभागीय शिक्षक, मुख्याध्यापक संघटना पदाधिकारी यांच्या दरवर्षीप्रमाणे सहविचार सभा राज्य मंडळ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.त्यावेळी परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबदली संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली व चर्चेअंती कर्मचाऱ्यांची अदलाबदली केल्यास शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयातील इतर वर्गाचे (इ.५वी ते इ.९वी व इ.११वी) कामकाज करणे कठीण होईल,तसेच प्रत्येक पेपरचे वेळी अन्य परीक्षा केंद्रावर जाणे-येणे सुरक्षिततेच्या दृष्टीने अडचणीचे होईल.यान्वये होणारा खर्च व इतर बाबी विचारात घेवून सरसकट सर्व परीक्षा केंद्रांवरील कर्मचाऱ्यांची अदलाबदल न करता ज्या परीक्षा केंद्रावर CCTV कॅमेरे उपलब्ध होणार नाहीत, अशा परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याची विनंती केली आहे.

परीक्षा
30/1/26

P.5
30/1/2026 5.15 p.m.

Scanned with OKEN Scanner

२. त्यान्वये सदर वस्तूस्थिती पाहता बहुतांश ठिकाणी CCTV कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. तसेच सर्व परीक्षा केंद्रावरील कर्मचारी न बदलणेबाबत संघटनांनी केलेली मागणी, कर्मचारी अदलाबदल केल्यास शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या शैक्षणिक कामकाजात येणारा विस्कळीतपणा तसेच होणारा खर्च या सर्व बाबी लक्षात घेवून सर्व परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबदल न करता ज्या परीक्षा केंद्रावर CCTV कॅमेरे उपलब्ध होणार नाहीत अशा परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

तरी मान्यतेनुसार सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी तात्काळ कार्यवाही करावी.ही विनंती.

आपली

Digitally signed by
Mrunali Ramsuram Katenge
Date: 30-01-2026 16:44:34

(मृणाली काटेंगे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner